# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.06.2025** **वारःशुक्रवार**

1. ॲक्सिओम फोर मोहिमेद्वारे शुभांशु शुक्ला यांच्या रूपानं पहिला भारतीय अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात दाखल,
2. शांघाय सहकार्य संघटनेच्या संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करायला भारताचा नकार,
3. मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया निवडणूक आयोगाकडून सुरू, आणि
4. भगवान जगन्नाथाच्या रथयात्रेला पुरीमध्ये उत्साहात सुरुवात.

**ॲक्सिओम**

ॲक्सिओम फोर या मोहिमेअंतर्गत भारतीय वायू दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह 4 अंतराळवीरांना घेऊन निघालेलं स्पेसएक्स ड्रॅगन हे अंतराळयान काल दुपारी 4 वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचलं. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणारे पहिले भारतीय ठरले आहेत. 1984 मध्ये राकेश शर्मा अंतराळात जाणारे पहिले भारतीय ठरले होते; त्यांच्यानंतर 41 वर्षांनी भारतीय अंतराळवीर अंतराळात पोहोचला आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणारा पहिला भारतीय अंतराळवीर होण्याचा बहुमानही शुभांशू शुक्ला यांना मिळाला आहे. या ऐतिहासिक मोहिमेत भारताबरोबरच अमेरिका, पोलंड आणि हंगेरीचे अंतराळवीर 14 दिवस अंतराळ स्थानकात राहून गुरुत्वाकर्षण, किरणोत्सार, अवकाशातील बीजरोपण या संदर्भातील विविध प्रयोग करणार आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर यशस्वीरित्या डॉकिंग केल्याबद्दल केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी शुभांशू शुक्ला आणि ॲक्सिओम-फोर मिशनमधील अन्य अंतराळवीरांचं अभिनंदन केलं आहे. ॲक्सिओम-4 मोहीमेच्या रूपानं अंतराळ क्षेत्रात भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून या क्षेत्रातील भारताच्या क्षमतेचं दर्शन अवघ्या जगाला पुन्हा एकदा झालं आहे, असं डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी म्हटलं आहे.

**शांघाय**

चीनच्या किंगदाओ इथं झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षणमंत्र्यांच्या बैठकीत भारतानं संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करायला नकार दिला आहे. घोषणापत्रात सीमापार दहशतवादी कारवायांचा उल्लेख नसल्यानं भारतानं नाराजी व्यक्त करत स्वाक्षरी करण्यास नकार दिला. दहशतवाद, कट्टरतावाद आणि अतिरेकी कारवाया हे प्रादेशिक शांतता आणि परस्पर विश्वासासाठी सर्वात मोठे धोके असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या बैठकीत सांगितलं. दहशतवाद, आणि शांती-समृद्धी एकत्र नांदू शकत नाहीत, हे लक्षात घेऊनच भारतानं सीमापार दहशतवादाची पायाभूत संरचना मोडण्यासाठी ऑपरेशन सिन्दूरच्या माध्यमातून आत्मरक्षणाचा अधिकार वापरला. दहशतवाद्यांचे तळ आता सुरक्षित नाहीत आणि त्यांना लक्ष्य करण्यास भारत मागेपुढे पाहणार नाही, असं सज्जड दम त्यांनी भरला. शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य राष्ट्रांनी दुटप्पी भूमिका न घेता दहशतवादाला पाठबळ देणाऱ्या देशांचा निषेध करावा, असं आवाहन राजनाथ सिंह यांनी केलं.

**<u>आरएसएस-आणीबाणी</u>**

'भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द आणीबाणीच्या काळात समाविष्ट करण्यात आले होते आणि ते कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानाचा भाग नव्हते;, असं सांगत, याबाबत फेरविचार करावा असं आवाहन राष्ट्रीय स्वयंसवेक संघानं केलं आहे. देशात 25 जून 1975 रोजी आणीबाणी जाहीर झाली. त्याला 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त काल नवी दिल्ली इथं आयोजित एका कार्यक्रमात बोलताना, संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसबाळे म्हणाले, की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या प्रस्तावनेत हे शब्द कधीही वापरले नाहीत. मात्र, आणीबाणीच्या काळात हे शब्द जोडले गेले. या मुद्द्यावर नंतर चर्चा झाली परंतु प्रस्तावनेतून हे दोन्ही शब्द काढून टाकण्याचा कोणताही प्रयत्न करण्यात आला नाही. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरीही उपस्थित होते. ते म्हणाले की, आणीबाणी हा देशाच्या इतिहासातील एक काळा काळ होता आणि त्यामुळं लाखो लोकांना त्रास सहन करावा लागला. या काळात लोकांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार झाले.

**<u>रेल्वे</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घकालीन दृष्टिकोनामुळे, देशाच्या विविध भागांना जोडणाऱ्या रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये वाढ झाली असून, मेक इन इंडिया उपक्रमामुळं देशात उत्पादन वाढलं आहे, असं प्रतिपादन रेल्वे आणि जलशक्ती राज्यमंत्री व्ही.सोमन्ना यांनी काल चेन्नईतील पेरांबूर इथं इंटिग्रल कोच फॅक्टरीमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात केलं. आयसीएफ दरवर्षी 50 वंदे भारत गाड्यांचे उत्पादन करेल. गेल्या वर्षी या कारखान्यात 3700 डबे तयार करण्यात आले होते आणि यावर्षी 4200 डबे तयार करण्याचं उद्दिष्ट आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<u>नोंदणी रद्द</u>**

आवश्यक अटी पूर्ण न केल्याबद्दल देशातील 345 नोंदणीकृत पण मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया निवडणूक आयोगानं सुरु केली आहे. 2019 पासून आतापर्यंत एकही लोकसभा, विधानसभा निवडणूक किंवा पोटनिवडणूक न लढलेल्या पक्षांची नोंदणी या प्रक्रियेत रद्द करण्यात येणार असून त्यापूर्वी त्यांना कारणे दाखवा नोटिस बाजावून त्यांची बाजू ऐकून घेतली जाणार आहे.

**<u>ट्रम्प-भारत करार</u>**

भारतासोबत लवकरच एक खूप मोठा करार करण्यात येणार असल्याचं काल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलं. अमेरिकेनं चीनसोबत एक करार केला असून लवकरच भारतासोबत एक मोठा करार होईल. इतर कोणत्याही देशासोबत करार केले जाणार नाहीत, असं ट्रम्प यांनी ठामपणे सांगितलं. मात्र, त्यांनी चीनशी झालेल्या कराराबाबत अधिक माहिती दिली नाही.

**<u>जगन्नाथ यात्रा</u>**

ओडिशामध्ये जगप्रसिद्ध भगवान जगन्नाथ आणि त्यांची भावंडं बलभद्र आणि सुभद्रा या देवतांच्या रथयात्रेला आज सकाळी पवित्र पुरी शहरात मोठ्या उत्साहात सुरूवात झाली आहे. त्यासाठी जगभरातील हजारो भक्त पुरीमध्ये जमले आहेत. ही रथयात्रा तिन्ही देवतांना श्री गुंदीचा मंदिराकडे नऊ दिवसांसाठी घेऊन जाते. बाराव्या शतकातील या श्री जगन्नाथ मंदिरातील तिन्ही देवतांचे नंदीघोष, तालध्वज आणि देवदालन लाकडी रथ तिथल्या सेवकांनी खळ्यातून श्री जगन्नाथ मंदिराच्या सिंह द्वाराकडे आणून दरवाज्याच्या समोर उभे केले आहेत. यात्रेच्या वेळापत्रकानुसार, श्री जगन्नाथ मंदिरापासून

त्यांच्या संबंधित रथांपर्यंत देवतांच्या भव्य मिरवणुकीचा 'पहाडी बिजे' विधी आज सकाळी साडेनऊ वाजता सुरू होणार आहे. गजपती राजा दिव्यसिंहदेव या तीन रथांवर आज दुपारी अडीच ते साडेतीनदरम्यान 'चेहरा पहानरा' विधी आणि शासकीय स्वच्छता विधी पार पडतील. त्यानंतर आज संध्याकाळी चार  वाजता सध्याच्या अनंत रोडवर रथ ओढण्यास सुरूवात होणार आहे.

**अमरनाथ यात्रा**

जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी श्रीनगरमधील राजभवनात राजकीय नेत्यांबरोबर काल बैठक घेऊन येत्या तीन जुलैपासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठीच्या तयारीबद्दल चर्चा केली. या बैठकीला मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि भाजप, काँग्रेस आणि पीडीपीचे पक्षनेते उपस्थित होते.

**संस्कृत**

संस्कृत भाषा ही जगाचं वैभव असून या भाषेचा तसंच साहित्य आणि संस्कृती यांचा दक्षिण आशियावर मोठा प्रभाव आहे, असं नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी म्हटलं आहे. काठमांडू इथं कालपासून आयोजित करण्यात आलेल्या 19 व्या जागतिक संस्कृत परिषदेत राष्ट्रपती पौडेल बोलत होते. पाच दिवस चालणाऱ्या या 19 व्या जागतिक संस्कृत परिषदेचं आयोजन नेपाळ संस्कृत विद्यापीठानं केलं आहे. जगभरातील अभ्यासक, संशोधक यामध्ये सहभागी झाले आहेत.

**शहा**

'हिंदी ही इतर भारतीय भाषांची प्रतिस्पर्धी नसून सहचर आहे', असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केलं. नवी दिल्ली इथं राजभाषा विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. प्रशासनानं लोकांच्या भाषेतच कामकाज करायला हवं, जोपर्यंत व्यक्ती तिच्या स्वतःच्या भाषेत व्यक्त होत नाही तोपर्यंत ती गुलामीच्या मानसिकतेतून बाहेर येणार नाही, असं शहा म्हणाले.

**गडकरी**

दुचाकी वाहनांची संपूर्ण पथकर मुक्ती सुरू राहील, असं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी स्पष्ट केलं. दुचाकींवर पथकर लादण्यात येणार असल्याचा कोणताही निर्णय प्रस्तावित नसून काही प्रसारमाध्यमांनी यासंदर्भात प्रसारित केलेलं वृत्त दिशाभूल करणारं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**हॉकी- मास्टर्स कप**

हॉकी इंडिया मास्टर्स करंडक स्पर्धेत, पुरुष गटात अंतिम लढत आज महाराष्ट्र आणि तमिळनाडू यांच्यात होणार आहे. आज संध्याकाळी चेन्नई इथं चार वाजता हा सामना होणार आहे. पहिल्या उपांत्य फेरीत, तमिळनाडूनं चंदीगडचा 3-0 असा पराभव केला तर दुसऱ्या उपांत्य फेरीत, महाराष्ट्राने ओडिशाविरुद्ध 4-1 असा विजय मिळवला. दरम्यान, महिलांच्या गटात आज अंतिम सामना ओडिशा आणि पंजाब यांच्यात होणार असून, चेन्नईमध्ये आज दुपारी दोन वाजता हा सामना होईल. पहिल्या उपांत्य फेरीत, ओडिशानं तमिळनाडूचा 4-1 असा पराभव केला, तर दुसऱ्या उपांत्य फेरीत पंजाबनं हरियाणाविरुद्ध 3-2 असा विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.